अपील अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभाग
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org
अपील क्र.७४/२०२४
जा.क्र उआ(सा.प्र.)/ आस्था/ ५९९९ दि.१२/८/२०२४

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त , सामान्य प्रशासन विभाग, पुणे महानगरपालिका
अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/७४/२०२४

श्री.प्रसाद देवराम डगळे,
१३०७, ए विंग सिटिफाय ठाणेकर
सिविक कॉ.हौ.सोसा, पडवली रोड,
चिखलोली, अंबरनाथ, ठाणे ---------------- अपिलार्थी

विरुद्ध

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी**
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

---------------- प्रतिवादी

श्री.प्रसाद देवराम डगळे, अंबरनाथ, ठाणे (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी मूळ माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये दि.२६/६/२०२४ (आ.क्र.५१९५, दि.०१/७/२०२४) रोजी प्राप्त झाला आहे.

अपिलार्थी यांचे मूळ अर्जातील माहितीबाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा.क्र.जमाअ/आस्था/३४००, दि.०५/७/२०२४ अन्वये अर्जास माहिती दिलेली आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| २६/६/२०२४ | ०१/७/२०२४ | ३१/७/२०२४ | ०५/७/२०२४ | ० |

सरळसेवा भरती दि.६/३/२०२३ पद आरोग्य निरिक्षक भरती दि.२१/६/२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आली त्या निवड यादी मधील ज्या पात्र एमेदवारांची निवड करण्यात आली त्या उमेदवारांच्या त्यांनी

सादर केलेल्या अनुभव सिद्ध करण्यात करीता जे प्रमाणपत्रे सादर केले त्या सर्व प्रमाण पत्रांची एक साक्षांकित प्रती मिळाव्यात, असे नमूद करुन दि.१४/७/२०२४ रोजी (आ.क्र.६६०० दि.१८/७/२०२४) अपिल अर्ज दाखल केला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| १४/७/२०२४ | १८/७/२०२४ | ०४/८/२०२४ | होय | -- |

सदर अपिलाची सुनावणी ऑनलाईन स्वरुपात घेणेकामी अपिलार्थी यांचेकडून इमेलद्वारे विनंती केली आहे. त्यानुसार अपील सुनावणी दि.६/८/२०२४ रोजी सकाळी ११.०० वा. ऑनलाईन आयोजित करण्यात आली असल्याचे जा.क्र.उप आयुक्त (सा.प्र.)/आस्था/४४९३ दि.३१/७/२०२४ रोजी कळविण्यात आले आहे. सुनावणीस अपिलार्थी ऑनलाईन व जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी ,आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते.

## विवेचन

सरळसेवा भरती दि.६/३/२०२३ पद आरोग्य निरिक्षक भरती दि.२१/६/२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आली त्या निवड यादी मधील ज्या पात्र एमेदवारांची निवड करण्यात आली त्या उमेदवारांच्या त्यांनी सादर केलेल्या अनुभव सिद्ध करण्यात करीता जे प्रमाणपत्रे सादर केले त्या सर्व प्रमाण पत्रांची एक साक्षांकित प्रती मिळाव्यात, असे नमूद करुन दि.१४/७/२०२४ रोजी (आ.क्र.६६०० दि.१८/७/२०२४) अपिल अर्ज दाखल केला आहे.

मूळ माहिती अधिकार अधिनियम २००५ पुणे मनपा आरोग्य निरिक्षक श्रेणी ३ पदासाठी दिलेले जाहिर प्रकटन दिले होते त्यानंतर परिक्षा घेण्यात आली त्यामधील पात्र अपात्र यादीमधील उमेदवारांनी दाखल केलेल्या कागदपत्रे व प्रमाणपत्र साक्षांकित प्रतीसह मिळावी. १ ते १३ कागदपत्रांची यादी मिळणेकामी दि.२६/६/२०२४ (आ.क्र.५१९५, दि.०१/७/२०२४) मिळणेकामी अर्ज दाखल केला आहे. जन माहिती अधिकारी यांनी जा.क्र.जमाअ/आस्था/३४००, दि.०५/७/२०२४ अन्वये माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम ८(१)(ज्ञ) नुसार माहिती नाकारली आहे.

जनहित साधणारी माहिती मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती अमान्य असल्याने अपील दाखल केले आहे, असे सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी नमूद केले आहे.

आरोग्य निरिक्षक पदाच्या भरतीची प्रक्रिया पूर्ण झाली नसल्याने दिलेली माहिती योग्य आहे, असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान नमूद केले.

आरोग्य निरिक्षक पदाची नेमणूकीची प्रक्रिया सुरु आहे. दि.२१/०६/२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेले जाहीर प्रकटन हे फक्त आरोग्य निरीक्षक (श्रेणी-३) पदाकरिता पात्र व अपात्र उमेदवारांची प्रथमदर्शनी यादी आहे. यामध्ये उमेदवारांकडून हरकती/सूचना ७ दिवसाचे आत सेवाभरती व परीक्षा नियंत्रण विभागाकडे लेखी स्वरुपात सादर करण्यास सांगितले आहे. सध्यस्थितीत सदर अभिलेखे गोपनीय स्वरूपाचे असल्याने प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच उपलब्ध करून देणे शक्य आहे, असे अपिलाधिकारी यांनी सुनावणी दरम्यान नमूद केले आहे. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी आस्थापना विभाग यांनी दिलेली माहिती योग्य आहे. त्यानुसार, सदर अपिल क्र.७३/२०२४ निकाली काढण्यात येत आहे.

P.Patil
12-8-24.
(प्रतिभा पाटील)
अपिलीय प्राधिकारी तथा
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका

---

सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे-१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.

सदर निकालाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**प्रत/-**
जन माहिती अधिकारी,
आस्थापना विभाग,
पुणे महानगरपालिका.